
ePaper **आंध्र प्रदेशात करोनामुळे दोघांचा मृत्यू, आठ जणांना संसर्ग**




वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | बुधवार, दि. 15 जुलै 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

पान 3 वरुन...

किती वेळा बुडणार महिला आयटीआय?

## देशभरात खळबळ; न्यायालयाने मागवली महत्वाची कागदपत्रे

# वैष्णोदेवी मंदिरात 500 कोटींची बनावट चांदी?

**महाईन्यूज । जम्मू**

**जम्मू-काश्मीरमधील प्रसिद्ध माता वैष्णोदेवी मंदिरात भाविकांनी अर्पण केलेल्या ५०० कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या चांदीबाबत गंभीर आरोप समोर आले आहेत. या कथित बनावट चांदी, अपहार आणि भेसळीच्या प्रकरणात जम्मू येथील न्यायालयाने कठोर भूमिका घेत गुन्हे शाखेच्या तपास अधिकाऱ्याला आवश्यक कागदपत्रांसह न्यायालयात हजर राहण्याचे आदेश दिले आहेत.**

जम्मूचे मुख्य न्यायदंडाधिकारी मुनीश कुमार मनहास यांच्या न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी झाली. न्यायालयाने गुन्हे शाखेच्या तपास अधिकाऱ्याला २९ जुलै रोजी होणाऱ्या पुढील सुनावणीसाठी सर्व संबंधित कागदपत्रांसह व्यक्तिशः उपस्थित राहण्याचे निर्देश दिले आहेत.

वकील दीपक शर्मा यांनी दाखल केलेल्या अर्जावर सुनावणीदरम्यान हे आदेश देण्यात आले. यापूर्वी त्यांनी गुन्हे शाखेचे पोलीस महानिरीक्षक आणि वरिष्ठ पोलीस अधीक्षक यांच्याकडे सविस्तर तक्रार दाखल केली होती. मंदिरात भाविकांनी अर्पण केलेल्या चांदीमध्ये कथित भेसळ, वस्तू बदलणे आणि संभाव्य आर्थिक अपहार झाल्याचा आरोप या तक्रारीत करण्यात आला आहे.

९ मे २०२६ रोजी दाखल करण्यात आलेल्या तक्रारीत गुन्हेगारी कट, फसवणूक, विश्वासघात, अपहार, नोंदींमध्ये फेरफार तसेच कॅडमियमयुक्त सामग्रीच्या वापरासारखे गंभीर आरोप करण्यात आले आहेत. या प्रकरणी एफआयआर नोंदवून सखोल चौकशी करण्याची मागणीही करण्यात आली आहे.







### तक्रारीत नेमके काय आरोप?

९ मे २०२६ रोजी दाखल करण्यात आलेल्या तक्रारीत मंदिरात अर्पण झालेल्या चांदीमध्ये कथित भेसळ, वस्तू बदलणे, अपहार, फसवणूक, विश्वासघात, नोंदींमध्ये फेरफार तसेच कॅडमियमयुक्त सामग्रीच्या वापराचे गंभीर आरोप करण्यात आले आहेत. या प्रकरणी एफआयआर नोंदवून सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली असून, न्यायालयाने गुन्हे शाखेकडून संबंधित कागदपत्रे सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

### ५०० कोटींच्या चांदीची न्यायालयीन चौकशी

माता वैष्णोदेवी मंदिरात भाविकांनी अर्पण केलेल्या ५०० कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या चांदीबाबत भेसळ, अपहार आणि फसवणुकीचे आरोप करण्यात आले आहेत. या प्रकरणात जम्मू न्यायालयाने गुन्हे शाखेच्या तपास अधिकाऱ्याला समन्स बजावत आवश्यक कागदपत्रांसह हजर राहण्याचे आदेश दिले असून, पुढील सुनावणी २९ जुलै रोजी होणार आहे.

तक्रारीनंतरही गुन्हे शाखेकडून प्रभावी कारवाई न झाल्याचा आरोप करत तक्रारदाराने न्यायालयात धाव घेतली. आता न्यायालयाने या प्रकरणातील तपासाची माहिती आणि संबंधित कागदपत्रे सादर करण्याचे आदेश दिल्याने या प्रकरणाकडे देशभराचे लक्ष लागले आहे.

# शेअर बाजाराचे वारकऱ्यांसाठी मोठे पाऊल!

## सहा ठिकाणी वारकऱ्यांना वित्तीय नियोजन आणि डिजिटल सुरक्षेचे मार्गदर्शन

**महाईन्यूज । पुणे**

**आषाढी वारीत दर वर्षी लाखो वारकरी सहभाग होतात. या वारकऱ्यांना अर्थसाक्षरतेचे धडे देण्याचे पाऊल मुंबई शेअर बाजाराने यंदा प्रथमच उचलले. पुण्यात वारीदरम्यान सहा ठिकाणी वारकऱ्यांसाठी अर्थसाक्षरतेचा उपक्रम राबविण्यात आला. त्यात वित्तीय नियोजनासह डिजिटल फसवणूक, सायबर सुरक्षा, गुंतवणुकीबद्दल वारकऱ्यांना सजग करण्यात आले. या निमित्ताने यातील फायदे आणि तोटे वारकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.**



या कार्यक्रमाचा उद्देश आर्थिक साक्षरता, आर्थिक फसवणूक, सायबर सुरक्षा आणि योग्य गुंतवणूक करण्याची जागरूकता निर्माण करणे हा होता. आषाढी वारीत सुमारे सहा ते आठ लाख वारकरी या मार्गावरून जातात. त्यामुळे वारकऱ्यांसह आणि सर्वसामान्य नागरिकांपर्यंत गुंतवणूक जनजागृती संदेश पोहोचवण्याची ही अनोखी संधी ठरली. विशेषतः ग्रामीण आणि निमशहरी भागातील नागरिकांपर्यंत आर्थिक साक्षरता आणि गुंतवणूक जनजागृती पोहोचवण्यावर भर देण्यात आला. समाजातील प्रत्येक घटकाला अर्थसाक्षर करून त्याला मुख्य प्रवाहात सहभागी करून घेण्याचा उद्देश यामागे होता.

भांडवली बाजार नियंत्रक संस्था सेबीच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. मुंबई शेअर बाजाराच्या गुंतवणूक संरक्षण निधीने म्युच्युअल फंड उद्योगाची शिखर संघटना ॲम्फीच्या सहकार्याने या उपक्रमाचे आयोजन केले. पुण्यात वारीदरम्यान ९ व १० जुलैला सहा ठिकाणी याअंतर्गत विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. सेबीचे कार्यकारी संचालक सुनील कदम, मुख्य सरव्यवस्थापक विकास एस.एस., उपसरव्यवस्थापक बाला कुमारी आणि सहायक सरव्यवस्थापक राहुल केलापुरे यांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला. यावेळी त्यांनी गुंतवणूक जनजागृती व आर्थिक साक्षरता उपक्रम अधिक मजबूत करण्याबाबत मार्गदर्शन केले.

### पथनाट्यांद्वारे जनजागृती

आषाढी वारीत वारकऱ्यांमध्ये जनजागृती करण्यासाठी विविध पथनाट्ये सादर करण्यात आली. या माध्यमातून सायबर फसवणूक, आर्थिक गैरव्यवहार, डिजिटल सुरक्षा आणि योग्य गुंतवणूक याबाबत महत्त्वाचे संदेश सोप्या पद्धतीने देण्यात आले. गुंतागुंतीचे आर्थिक विषय सहज आणि आकर्षक पद्धतीने मांडल्यामुळे या पथनाट्यांना वारकऱ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

### फसवणूक टाळण्यावर भर

देशभरात डिजिटल व्यवहारांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून, ते दैनंदिन जीवनाचा भाग बनले आहेत. देशातील प्रत्येक कानाकोपऱ्यात यूपीआयच्या माध्यमातून व्यवहार होत आहेत. ग्रामीण भागातही त्याचा मोठ्या प्रमाणात वापर होत आहे. याचाच फायदा घेऊन सायबर गुन्हेगारांकडून फसवणुकीचे प्रकार वाढले आहेत. अशी फसवणूक टाळण्यासाठी काय करावे, यासाठीच्या अतिशय सोप्या गोष्टी वारकऱ्यांना सांगण्यात आल्या.

# पुणे शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी ९ हजार कोटी!

**महाईन्यूज । पुणे**

**'शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी 'उच्च क्षमता द्रुतगती मार्ग' (एचसीएमटीआर) प्रकल्पाला प्राधान्य देण्यात येणार असून, पावसाळा संपल्यानंतर या प्रकल्पाला वेगाने सुरुवात होईल. या प्रकल्पासाठी केवळ १५ टक्के खासगी जागांचे भूसंपादन करावे लागणार असून, उर्वरित जागा या राज्य तसेच केंद्र सरकारच्या मालकीच्या असल्याने अडचण येणार नाही. या प्रकल्पाचा सुधारित प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार केला जाणार आहे.**



गेल्या आठवड्यात राज्य सरकारने वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी शहरात 'एचसीएमटीआर', वर्तुळाकार मार्ग (रिंग रोड) तसेच भुयारी मार्ग करण्याचे नियोजन केले असून, त्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी हे तीन प्रकल्प मार्गी लावण्याचा संकल्प राज्य सरकारने केला असून, त्या दृष्टीने पावले उचलण्यास सुरुवात करण्यात आली आहे.

वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजाविणाऱ्या या तिन्ही प्रकल्पांसंदर्भात महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी बैठक घेतली. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना आयुक्त राम यांनी तिन्ही उपाययोजनांपैकी 'एचसीएमटीआर' प्रकल्पाला प्राधान्य देण्यात येणार असल्याचे सांगितले. सुमारे ९ हजार कोटी रुपये खर्चाच्या या ३६ किलोमीटर लांब व २४ मीटर रुंद उन्नत मार्गाचे काम पावसाळा संपल्यानंतर तातडीने सुरू करण्याचा पालिकेचा प्रयत्न असल्याचे ते म्हणाले.

आयुक्त राम म्हणाले, "एचसीएमटीआर' प्रकल्पासाठी केवळ १५ टक्के जागेचेच संपादन करावे लागणार आहे. सुमारे ६० टक्के जमीन शासनाची असून, २५ टक्के भागावर सध्या रस्ते अस्तित्वात आहेत. विद्यमान आराखड्यात मेट्रो मार्गाशी १० ठिकाणी 'क्रॉस सेक्शन' होत असून त्या बाबत मेट्रोशी चर्चा केली जाईल. शहराच्या वाहतुकीला गती देण्यासाठीच्या तिन्ही प्रकल्पांपैकी हा प्रकल्प सर्वात आधी पूर्ण होऊ शकतो. त्यामुळेच या प्रकल्पाचा सुधारित आराखडा तयार करून निविदा प्रक्रिया तातडीने सुरू करण्यात येईल. काही टप्प्यात (पॅकेजेस) हे काम केले जाईल.' या मार्गावर पथकर (टोल) लावण्यात येणार नाही,' असे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी सांगितले.

'एचसीएमटीआर' प्रकल्पाची अंमलबजावणी बांधा वापरा व हस्तांतरित करा (बीओटी) पद्धतीने केली जाणार नसून, 'एचएएम' (हॅम) किंवा सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) मॉडेलचा पर्याय विचाराधीन आहे. त्यासाठी आर्थिक आणि तांत्रिक सल्लागारांची नियुक्ती प्रक्रिया सुरू आहे. पुढील काही दिवसांमध्ये यासाठी स्वतंत्र कक्षही स्थापन केला जाणार आहे.'

'वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी दुसरे प्राधान्य वर्तुळाकार रस्त्याला (रिंग रोड) दिले जाणार आहे. यासाठी सुमारे २७ हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून, ८३ किलोमीटर लांबीचा हा रस्ता असणार आहे. 'रिंग रोड'चा सर्वाधिक भाग सध्या महापालिकेच्या हद्दीत येतो.

### आवश्यकतेनुसार बोगदेही करणार


'जागा उपलब्ध होत नसल्याने काही महिन्यांपूर्वी 'पाताललोक' (भुयारी मार्ग) करण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली होती. हा प्रकल्प आवश्यकतेनुसारच राबवला जाईल. 'एचसीएमटीआर', 'रिंग रोड' व बोगदे तिन्ही प्रकल्प एकमेकांना जोडलेले असतील. या तिन्ही प्रकल्पांसाठी आंतरराष्ट्रीय आर्थिक व प्रकल्प सल्लागार नेमले जातील,' असेही राम यांनी स्पष्ट केले.

# किती वेळा बुडणार महिला आयटीआय? दोन कोटींचे नुकसान

## पुराच्या पुनरावृत्तीने शासकीय मालमत्तेची हानी; विद्यार्थिनींच्या जीवित सुरक्षेवर गंभीर प्रश्न

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पवना नदीच्या पुरामुळे कासारवाडी येथील शासकीय महिला औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला (आयटीआय) पुन्हा फटका बसला आहे. पुराचे पाणी तळमजल्यात शिरल्याने फर्निचर, स्मार्ट बोर्ड, इलेक्ट्रॉनिक व विद्युत साहित्य तसेच २० वर्षांचे महत्त्वाचे अभिलेख खराब होऊन सुमारे दोन कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. वारंवार होणाऱ्या या प्रकारामुळे विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, आयटीआयचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करण्याची मागणी पालकांकडून होत आहे.**



मुसळधार पावसामुळे पवना नदीला आलेल्या पुराचे पाणी कासारवाडी येथील महिला आयटीआयच्या तळमजल्यात शिरले. त्यामुळे प्राचार्यांचे कार्यालय, वर्गखोल्या आणि इतर विभागांतील फर्निचर, स्मार्ट बोर्ड, संगणक, इलेक्ट्रॉनिक व विद्युत साहित्याचे मोठे नुकसान झाले. तसेच सुमारे २० वर्षांचे महत्त्वाचे अभिलेखही पाण्यात भिजून खराब झाले आहेत. या सर्व नुकसानीचा प्राथमिक अंदाज सुमारे दोन कोटी रुपये इतका आहे. पुरामुळे संस्थेचे शैक्षणिक कामकाजही विस्कळीत झाले. विद्यार्थिनींची नियोजित परीक्षा रद्द करावी लागली. त्यानंतर दोन दिवसांनी वरच्या मजल्यावर परीक्षेचे आयोजन करण्यात आले.

> “ महापुरामुळे कासारवाडी आयटीआयच्या झालेल्या नुकसानीचा अहवाल महापालिका अतिरिक्त आयुक्तांना देणार आहोत. तसेच तळमजल्यावरील विभाग वरच्या मजल्यावर हलविले जातील. त्याचबरोबर जागेची उपलब्धता झाल्यास आयटीआयचे स्थलांतर देखील करण्याचा विचार सुरु आहे.
> **- शशिकांत पाटील, प्राचार्य, महापालिका मोरवाडी आयटीआय.**

आयटीआयमध्ये यापूर्वीही अनेक वेळा पुराचे पाणी शिरले आहे. नदीपात्रालगत असल्याने प्रत्येक मोठ्या पुरात संस्थेला फटका बसतो. त्यामुळे लाखो रुपयांच्या शासकीय मालमत्तेचे वारंवार नुकसान होत असून विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण होत आहे. या पार्श्वभूमीवर केवळ दुरुस्तीवर खर्च करण्याऐवजी प्रशासनाने या आयटीआयचे अन्य सुरक्षित ठिकाणी तातडीने स्थलांतर करावे, अशी मागणी पालक, माजी विद्यार्थी आणि स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

### स्थलांतराचा प्रस्ताव विचाराधीन

महापुरामुळे झालेल्या नुकसानीचा सविस्तर अहवाल महापालिका प्रशासनाकडे सादर करण्यात येणार आहे. तातडीच्या उपाययोजनेत तळमजल्यावरील विभाग वरच्या मजल्यावर हलविण्यात येणार असून, जागेची उपलब्धता झाल्यास महिला आयटीआयचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करण्याचाही विचार सुरू असल्याची माहिती प्राचार्य शशिकांत पाटील यांनी दिली.

# अखेर हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रोचा मुहूर्त पुन्हा हुकला



**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो मार्गावरील ‘मेट्रो ३’चा पहिला टप्पा १५ जुलैपासून सुरू करण्याचे नियोजन पुन्हा एकदा फसले आहे. मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्त (सीएमआरएस) यांच्याकडून अंतिम सुरक्षा प्रमाणपत्र अद्याप प्राप्त झाले नसल्याने उद्यापासून प्रवासी सेवा सुरू होणार नाही. त्यामुळे मेट्रोची प्रतीक्षा आणखी लांबली असून, आयटी पार्कमधील हजारो कर्मचारी आणि प्रवाशांची पुन्हा एकदा निराशा झाली आहे.**

यावेळी आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी बचावकार्याची माहिती देताना सांगितले की, महापालिकेच्या सर्व विभागांसह राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ), भारतीय सेना, अग्निशमन विभाग, पोलीस प्रशासन आणि इतर संबंधित यंत्रणा पूर्ण समन्वयाने अखंड बचावकार्य करत आहेत. उपलब्ध मनुष्यबळ, यंत्रसामग्री आणि तांत्रिक साधनांचा वापर करून प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

"बचावकार्य पूर्ण होईपर्यंत धीर ठेवा. प्रशासन प्रत्येक क्षणाची माहिती देत असून अडकलेल्या व्यक्तींना सुखरूप बाहेर काढण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत," असा दिलासाही त्यांनी नातेवाईकांना दिला.

घटनास्थळी थांबलेल्या नातेवाईकांच्या भोजन, निवास व इतर आवश्यक सुविधांची तातडीने व्यवस्था करण्याचे निर्देश आयुक्तांनी अँटनी अँड लारा कंपनीच्या व्यवस्थापनाला दिले.

दरम्यान, एनडीआरएफचे सेकंड कमांड दीपक तिवारी यांनी बचाव मोहिमेची तांत्रिक माहिती नातेवाईकांना दिली. यावेळी अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांच्यासह महापालिकेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### आयटीयन्सची पुन्हा निराशा

हिंजवडी आयटी पार्कमधील आयटीयन्सला दररोज वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. मेट्रो सेवा सुरू झाल्यास आयटीयन्सला दिलासा मिळू शकतो. मात्र, मेट्रो सेवा १५ जुलै रोजी सुरू होणार नसल्याने आयटीयन्सची पुन्हा निराशा झाली आहे.

### पाचव्यांदा बदलली मुदत

२३ किलोमीटर लांबीच्या हिंजवडी-शिवाजीनगर ‘मेट्रो ३’ प्रकल्पाची मुदत आतापर्यंत तब्बल पाच वेळा बदलली आहे. सुरुवातीला संपूर्ण मार्ग एकाच टप्प्यात सुरू करण्याचे नियोजन होते. मात्र, त्यानंतर राज्य शासनाने टप्प्याटप्प्याने (फेज रोलआऊट) सेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला. मुख्यमंत्री तथा ‘पीएमआरडीए’चे अध्यक्ष देवेंद्र फडणवीस यांनी १५ जुलैपर्यंत पहिला टप्पा सुरू करण्याचे निर्देश दिले होते. मात्र, अंतिम सुरक्षा प्रमाणपत्र न मिळाल्याने हा मुहूर्तही हुकला आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या नियोजन आणि अंमलबजावणीबाबत पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

> “ सीएमआरएस यांच्याकडून अंतिम सुरक्षा प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच प्रवासी सेवा सुरू करण्याबाबत अंतिम निर्णय घेतला जाईल. सुरक्षा मानकांमध्ये कोणतीही तडजोड केली जाणार नाही. आवश्यक तांत्रिक आणि प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच मेट्रो सेवा सुरू करण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.
> **- रिनाज पठाण, मुख्य अभियंता, पीएमआरडीए**



## भूमिका

**आषाढ अर्धा उलटला तरी राज्यातील अनेक भागांत समाधानकारक पाऊस झालेला नाही. रोज आभाळ दाटून येते, विजांचा कडकडाट होतो; पण पाऊस मात्र गावाच्या उंबरठ्यावरूनच परत फिरतो. या अनिश्चित हवामानाचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसत असला, तरी त्याची झळ संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेला पोहोचत आहे.**

# आभाळ भरतंय, पण शेतकऱ्यांच्या डोळ्यात अश्रूच!



पावसावर अवलंबून असलेल्या शेतीची चाके थांबली की गावातील किरकोळ व्यापारी, दुकानदार, मजूर, वाहतूकदार आणि इतर व्यवसायही मंदावतात. त्यामुळे पाऊस हा केवळ शेतीचा विषय नसून ग्रामीण अर्थचक्राचा कणा आहे, हे पुन्हा अधोरेखित होत आहे.

यंदा जूनच्या सुरुवातीला झालेल्या तुरळक पावसामुळे अनेक शेतकऱ्यांनी आशेने पेरण्या केल्या. मात्र त्यानंतर पावसाने दडी मारल्याने अनेक ठिकाणी उगवलेली पिके कोमेजू लागली आहेत.

दुबार पेरणीचे संकट डोईजड झाले असून त्यासाठी लागणारा अतिरिक्त खर्च शेतकऱ्यांच्या आवाक्याबाहेर जात आहे. पाऊस लांबल्यामुळे बाजारपेठेतही मंदीचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतकऱ्यांच्या हातात पैसा नसल्याने खरेदी कमी होते आणि त्याचा परिणाम गावातील छोट्या व्यावसायिकांवरही होतो. हवामानातील हा बदल केवळ नैसर्गिक चक्राचा भाग मानून चालणार नाही.

जंगलतोड, डोंगरांची अवैध उत्खनने, वाढते काँक्रीटीकरण, प्रदूषण आणि पर्यावरणाचा सातत्याने होणारा ऱ्हास यामुळे निसर्गाचा समतोल बिघडत आहे. विकासाच्या नावाखाली लाखो झाडांची कत्तल होत असताना वृक्षलागवडीच्या घोषणा मात्र कागदावरच मर्यादित राहतात.

लावलेल्या रोपांचे संगोपन आणि संवर्धन याकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही. परिणामी पावसाचे चक्र अधिकच अनिश्चित बनत आहे. दरवर्षी दुष्काळाची चाहूल लागली की कर्जमाफी, मदत पॅकेज किंवा नुकसानभरपाईची घोषणा केली जाते. मात्र ही तात्पुरती मलमपट्टी ठरते. जलसंधारण, पाणलोट विकास, सिंचनक्षमता वाढविणे, भूजल पुनर्भरण, स्थानिक जलस्रोतांचे पुनरुज्जीवन आणि पर्यावरण संरक्षण यांसारख्या दीर्घकालीन उपाययोजनांवर अधिक भर देणे आवश्यक आहे.

हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर शेती अधिक सक्षम आणि टिकाऊ करण्यासाठी नियोजनबद्ध धोरणांची गरज आहे. पाऊस हा केवळ निसर्गाचा चमत्कार नसून लाखो कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा आधार आहे. तो वेळेवर आणि पुरेसा पडावा, यासाठी पर्यावरणाचे रक्षण करणे ही सामूहिक जबाबदारी आहे. अन्यथा आभाळ भरून येईल, आशाही निर्माण होईल; पण पाऊस गावात न फिरकल्याने शेतकऱ्यांसह संपूर्ण ग्रामीण जीवन निराशेच्या गर्तेतच अडकून राहील.

## प्रासंगिक »

### जीवनाचे सार

**एका विलासी बादशहाला ऐषआराम, व्यसने आणि भोग यांची प्रचंड आवड होती. तो नेहमी आपल्या प्रधानालाही जीवनाचा पुरेपूर उपभोग घेण्याचा सल्ला देत असे.**

मात्र प्रधान सन्मार्गी असल्याने त्याला बादशहाची ही वृत्ती पटत नव्हती. एकदा बादशहा प्रधानाच्या कामावर खूश होऊन त्याला मौल्यवान शाल भेट देतो.

दरबाराबाहेर पडताच प्रधान त्या शालीने नाक पुसतो. ही गोष्ट समजताच बादशहा संतापून त्याला जाब विचारतो. त्यावर प्रधान शांतपणे म्हणतो, "महाराज, तुम्हीच मला हे शिकवले आहे. देवाने दिलेले मानवी शरीर या शालीपेक्षाही अधिक मौल्यवान आहे. तरीही तुम्ही व्यसने आणि वाईट सवयींमुळे त्याचा अपमान करत आहात."

प्रधानाचे हे विचार ऐकून बादशहाला स्वतःची चूक उमजते. तो पश्चात्ताप करून व्यसने आणि गैरवर्तनाचा त्याग करतो व प्रजेप्रती आपले कर्तव्य पार पाडण्याचा संकल्प करतो.

**- तात्पर्य : ईश्वराने दिलेले शरीर, बुद्धी आणि विवेक यांचा सदुपयोग करूनच जीवन खऱ्या अर्थाने सार्थकी लावता येते.**

सामाजिक कल्याणाच्या योजना या गरजू नागरिकांना आधार देण्यासाठी असतात; मात्र त्यांची अंमलबजावणी पारदर्शक आणि आर्थिकदृष्ट्या जबाबदार पद्धतीने होणे तितकेच महत्त्वाचे आहे.

# लाडकी बहीण योजनेतील आर्थिक शिस्तीचा प्रश्न



महाराष्ट्रातील 'लाडकी बहीण' योजनेसंदर्भात नियंत्रक व महालेखापरीक्षक (कॅग) यांच्या अहवालात नोंदविण्यात आलेल्या निरीक्षणांमुळे या योजनेच्या अंमलबजावणीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अपात्र लाभार्थ्यांना मोठ्या प्रमाणावर लाभ मिळाल्याचे आणि वित्तीय व्यवस्थापनातील त्रुटी समोर आल्याने शासनाच्या नियोजनक्षमतेवर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

अहवालानुसार, लाभार्थ्यांच्या पडताळणीत झालेल्या त्रुटींमुळे मोठ्या संख्येने अपात्र व्यक्तींना योजनेचा लाभ मिळाला. त्यानंतर ई-केवायसी, उत्पन्न निकष, सरकारी नोकरी, वयोमर्यादा आणि इतर अटींच्या आधारे लाखो लाभार्थ्यांची नावे वगळण्यात आली. यावरून सुरुवातीच्या टप्प्यात पात्रता पडताळणी प्रभावीपणे झाली नसल्याचे स्पष्ट होते. कोणत्याही लोककल्याणकारी योजनेत लाभ योग्य व्यक्तींपर्यंत पोहोचणे ही शासनाची मूलभूत जबाबदारी असते. याचबरोबर राज्याच्या आर्थिक व्यवस्थापनाबाबतही कॅगने उपस्थित केलेले मुद्दे चिंताजनक आहेत. कोट्यवधी रुपयांचा निधी विविध खात्यांमध्ये पडून राहणे, निधी वितरणातील विसंगती आणि आर्थिक शिस्तीतील त्रुटी यामुळे सार्वजनिक निधीच्या प्रभावी वापरावर प्रश्न निर्माण होतात. राज्यावर वाढत्या कर्जाचा भार असताना अशा प्रकारची वित्तीय बेशिस्त दीर्घकालीन दृष्टीने परवडणारी नाही.लोकाभिमुख योजना राबविणे आवश्यक असले तरी त्या निवडणूककेंद्रित किंवा घाईघाईने अंमलात आणल्या गेल्यास त्याचे परिणाम शासनालाच भोगावे लागतात.

अपात्र लाभार्थ्यांना दिलेला निधी परत मिळविणेही व्यवहार्य आणि राजकीयदृष्ट्या कठीण ठरते. त्यामुळे सुरुवातीपासूनच काटेकोर पडताळणी, डिजिटल सत्यापन आणि नियमित लेखापरीक्षण यंत्रणा सक्षम असणे गरजेचे आहे. लोककल्याणाच्या योजनांचे यश केवळ लाभार्थ्यांच्या संख्येवर नव्हे, तर निधी योग्य व्यक्तींपर्यंत पारदर्शकपणे आणि कार्यक्षमतेने पोहोचण्यात असते. सार्वजनिक पैशाचा प्रत्येक रुपया हा जनतेचा आहे, याची जाणीव ठेवून शासनाने आर्थिक शिस्त, उत्तरदायित्व आणि पारदर्शकतेला सर्वोच्च प्राधान्य दिले, तरच अशा योजनांवरील जनतेचा विश्वास कायम राहील.

## ।। अभंगवाणी ।।



पावलें पावलें तुझें आम्हां सर्व ।
दुजा नको भाव होऊं देऊं ॥१॥

जेथें तेथें तुझीं च पाउलें ।
त्रिभुवन संचलें विठ्ठला गा ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे.
एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# इगतपुरीत पर्यटकांवर हल्ला; 9 जण ताब्यात

## फरार संशयिताचा भिवंडी-वाडा परिसरात शोध; तपासासाठी विशेष पथके तैनात

महाईन्यूज । नाशिक

**इगतपुरी तालुक्यातील भावली धबधबा परिसरात भ्रमंतीसाठी गेलेल्या पर्यटकांवर हल्ला करून नंतर १० ते १२ किलोमीटर पाठलाग करीत त्यांच्या वाहनाची तोडफोड केल्याच्या प्रकरणात नाशिक ग्रामीण पोलिसांनी नऊ संशयितांना ताब्यात घेतले आहे. यातील एक सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर हत्येचा गुन्हा दाखल आहे. तर फरार असणाऱ्या एकाचा भिवंडी, वाडा परिसरात शोध घेतला जात आहे.**




या कारवाईची माहिती नाशिक ग्रामीणचे पोलीस अधिक्षक डॉ. डी. एस. स्वामी यांनी पत्रकार परिषदेत दिली. मुसळधार पावसानंतर इगतपुरी व त्र्यंबकेश्वर परिसरात पर्यटकांची मोठी गर्दी उसळली आहे. या भागात मद्यपान करून टवाळखोरांकडून अनेकदा गोंधळ, धुडगूस घालण्याचे प्रकार घडले आहेत. इगतपुरी लगतच्या भावली धरण परिसरात रविवारी नाशिकमधील कुटुंबिय फिरण्यासाठी गेले होते. तेव्हा हा प्रकार घडला. छेड काढल्याचा जाब विचारल्यानंतर टोळक्याने कुटुंबाला धक्काबुक्की केली. यामुळे घाबरून संबंधित कुटुंब आपल्या मोटारीतून मार्गस्थ झाले. नंतर या टोळक्याने त्यांचा पाठलाग करून वाहनाची तोडफोड केली. या घटनेमुळे भेदरलेले हे कुटुंबिय थेट नाशिक शहरातील अंबड पोलीस ठाण्यात पोहोचले. या प्रकरणी दाखल झालेला गुन्हा इगतपुरी पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आला आहे. या प्रकरणी हत्येचा प्रयत्न, दरोडा, विनयभंग अशी कलमे लावण्यात आली आहेत.

पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण आणि व्हिडिओ फुटेजच्या मदतीने तपास करून आतापर्यंत नऊ संशयितांना ताब्यात घेतले आहेत. हे सर्व संशयित इगतपुरी तालुक्यातील नांदगाव सदो, बलायदुरी, देवळे घोटी, माणिक खांब, गिरणारे या आसपासच्या गावांतील असून एकमेकांचे परिचित आहेत. यातील एका संशयितावर २०२० मध्ये हत्येचा गुन्हा दाखल होता. तक्रारदारांनी तक्रारीत सात ते आठ संशयित म्हटले होते. परंतु, पोलिसांनी आरोपींना गुन्ह्यात मदत करणारे, आश्रय देणारे व पळून जाण्यास मदत करणाऱ्यांचाही शोध घेऊन त्यांना गुन्ह्यात समाविष्ट केल्याचे पोलीस अधिक्षक डॉ. स्वामी यांनी सांगितले.

### दोनदा वादाच्या घटना...


आरोपींनी एका व्यक्तीला शिट्टी वाजवण्यास सांगितल्यावरून सुरुवातीला वाद झाला. तो व्यक्ती निघून गेल्यावर तेथील इतर स्थानिक लोकांनी पर्यटकांशी पुन्हा वाद घातला. त्यातून ही तोडफोडीची व हल्ल्याची घटना पुढे सात ते आठ किलोमीटर अंतरावर घडली. जिथे प्रारंभी वाद झाला, तिथे पोलीस बंदोबस्तही होता. पोलीस चौकीही आहे. पहिले वादावादीचे ठिकाण धरण परिसरात होते. या वादाचे पर्यावसन पुढे सात ते आठ किलोमीटर अंतरावर झाले. जिथे रस्त्यावर टोळक्याने गाडीवर हल्ला केला, काचा फोडल्या. पोलिसांच्या ११२ क्रमांकाच्या वाहनाने तक्रारदारांशी संपर्क केला होता. परंतु, ते इतके वेगात पुढे निघून गेले होते. त्यांनी अंबड पोलीस ठाण्यात तक्रार दिली. असे नाशिकचे पोलीस अधिक्षक डॉ. डी. एस. स्वामी यांनी सांगितले.

# बंडखोर खासदारांकडून ठाकरेंच्या शिवसेनेच्या विलीनीकरणाचा प्रयत्न

महाईन्यूज । मुंबई

**शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचं नाव आणि चिन्ह वापरून २०२४ च्या लोकसभेच्या निवडणुकीत निवडून आलेल्या सहा खासदारांनी आता बंडखोरी करून एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत अधिकृत प्रवेश केला आहे. या सहा खासदारांना खासदार अरविंद सावंत यांनी पत्र पाठवून कायदेशीर इशारा दिला. शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचं कोणत्याही प्रकारचं विलीनीकरण होणार नसल्याचं अरविंद सावंतांनी स्पष्ट केलं असून या पत्राची प्रत लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनाही देण्यात आली आहे.**





**SHIVSENA (Uddhav Balasaheb Thackeray)**
**Parliamentary Party**

**Date: 13th July, 2026**

To,

**Shri.**

Member of Parliament (Lok Sabha)

Constituency

**Subject: No merger of Shiv Sena (Uddhav Balasaheb Thackeray) with any political party**

Respected Shri.

1. I am addressing this communication to you in my capacity as the Leader of the **Shiv Sena (Uddhav Balasaheb Thackeray) Parliamentary Party** in the Lok Sabha, and on behalf of the **Shiv Sena (Uddhav Balasaheb Thackeray)** ("the Party"), being the original political party on whose symbol, mandate and support you stand elected as a Member of the Lok Sabha.
2. As you were aware, you were given a ticket by **Shiv Sena (Uddhav Balasaheb Thackeray)** political party in the 2024 Lok Sabha elections. The people of your constituency reposing faith in the leadership of Shri Uddhav Balasaheb Thackeray ji elected you through the name and Symbol of **Shiv Sena (Uddhav Balasaheb Thackeray)**. The election was fought *interalia* against the candidates set up by Shiv Sena led by Shri Eknath Shinde.
3. It has come to our knowledge through reports in public domain that you, along with certain other Members of Parliament are attempting to portray that there is a 'merger' of **Shiv Sena (Uddhav Balasaheb Thackeray)** with the Shiv Sena headed by Shri Eknath Shinde. It is also learnt that you had approached the Hon'ble

- Page 1 of 3 -

128 A, Parliament House, New Delhi - 110001
Tel. 011-23035867, 23035868

अरविंद सावंत यांनी बंडखोर खासदार संजय दिना पाटील, नागेश पाटील आष्टीकर, ओमप्रकाश राजेनिंबाळकर, संजय जाधव आणि संजय देशमुख यांना हे पत्र पाठवले आहे. "शिवसेना (उद्धव ठाकरे) हाच मूळ राजकीय पक्ष असून, पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना किंवा इतर कोणत्याही राजकीय पक्षासोबत विलीनीकरणाला कोणतीही मंजुरी दिलेली नाही आणि तसा कोणता प्रस्तावही स्वीकारलेला नाही", असं सावंत यांनी पत्रात स्पष्ट केलं आहे.

"शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाच्या नाव आणि चिन्हावर तुम्ही निवडून आले आहात. तुम्हाला २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत उद्धव ठाकरेंनी तिकिट दिलं. तुमच्या मतदारांनी उद्धव ठाकरेंच्या नावाने तुम्हाला निवडून दिलं आहे. ज्या पक्षात आता तुम्ही गेला आहात, त्या पक्षातील उमेदवारांविरोधात तुम्ही निवडणूक लढला आहात. सार्वजनिकरित्या मिळालेल्या माहितीनुसार, तुम्ही आणि तुमचे काही सहकारी मिळून शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचं एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत विलीनीकरण करण्याचा प्रयत्न करत आहात. यासंदर्भात तुम्ही लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांची भेट घेऊन या विलीनीकरणासंदर्भात चर्चाही केली आहे", असं अरविंद सावंत यांनी पत्रात नमूद केलं आहे.

"शिवसेना (उद्धव ठाकरे) हा मूळ पक्ष आहे. शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाने अशा प्रकारच्या कोणत्याही विलीनीकरणाची प्रक्रिया सुरू केलेली नाही किंवा त्याला परवानगी दिलेली नाही", असंही त्यांनी स्पष्ट केलं.

या पत्राची एक प्रत लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याकडेही पाठवण्यात आली आहे. मूळ पक्षाच्या मंजुरीशिवाय कोणत्याही गटाला किंवा विलीनीकरणाला संसदेत मान्यता देऊ नये, अशी मागणी ठाकरे गटाने केली आहे. हे सर्व खासदार शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाच्या अधिकृत चिन्हावर आणि उद्धव ठाकरेंच्या नावावर निवडून आले असून, पक्षाशी प्रतारणा करणे हा मतदारांचा अवमान आहे, असंही पक्षाकडून सांगण्यात आलं आहे.

# आखातात पुन्हा युद्ध पेटले!

## इराणचा युएईच्या जहाजांवर भीषण क्षेपणास्त्र हल्ला, १ भारतीय खलाशी ठार; ८ जखमी

**महाईन्यूज । अमेरिका**

**अमेरिका आणि इराण यांच्यात पुन्हा एकदा तणाव वाढल्यामुळे त्याचे पडसाद होर्मुझ सामुद्रधुनीत उमटत आहेत. इराणने संयुक्त अरब अमिरातीच्या दोन जहाजांवर केलेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यात एका भारतीय खलाशाचा मृत्यू झाल्याची माहिती मिळत आहे. याबरोबरच आठ जण जखमी झाले आहेत, अशी माहिती यूएईच्या संरक्षण मंत्रालयाने दिली आहे. अमेरिका-इस्रायल आणि इराणमधील संघर्षाचे परिणाम संपूर्ण आखातावर दिसू लागले आहेत.**




यूएईच्या संरक्षण मंत्रालयाने एक्सवर पोस्ट शेअर करत या हल्ल्याची माहिती दिली. मोम्बासा आणि अल बहिया हे दोन तेलवाहू जहाज ओमानच्या सागरी हद्दीतून होर्मुझच्या सामुद्रधुनीच्या दक्षिण मार्गातून जात असताना हा हल्ला झाला. मृत्युमुखी पडलेला भारतीय खलाशी हा मोम्बासा तेलवाहू जहाजावर कार्यरत होता, असे मंत्रालयाने सांगितले.

आठ नागरिक जखमी झाले असून त्यापैकी सहा जण भारतीय नागरिक आहेत, तर दोन युक्रेनियन नागरिकांचा त्यात समावेश आहे.

यूएईच्या संरक्षण मंत्रालयाने म्हटले की, या हल्ल्यासाठी इराण जबाबदार असून क्षेपणास्त्राच्या माऱ्यामुळे जहाजावर आग लागली असून मालमत्तेचे मोठे नुकसान झाले. सध्या जहाजावरील आग आटोक्यात आणण्यात आली आहे.

यूएईने या हल्ल्याचा तीव्र शब्दात निषेध नोंदवला आहे. इराणचा हल्ला आंतरराष्ट्रीय नियमांचे उल्लंघन करणारा असून आम्ही आमचा प्रत्युत्तराचा अधिकार वापरू शकतो, असे उत्तर यूएईने दिले आहे. देशाचे सार्वभौमत्व, सुरक्षा आणि देशाची सागरी वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी आम्ही योग्य ती पावले उचलू, असेही संरक्षण मंत्रालयाने म्हटले आहे.

"संयुक्त अरब अमिरात कोणत्याही धोक्याचा सामना करण्यास आणि प्रादेशिक स्थैर्याला बाधा आणणाऱ्या कृतींना निर्णायक प्रत्युत्तर देण्यास पूर्णपणे तयार आहे", असे निवेदन यूएईकडून देण्यात आले आहे.

दरम्यान, यूके मॅरिटाइम ट्रेड ऑपरेशन्स एजन्सीने दिलेल्या माहितीनुसार, ओमानमधील कलहात बंदराच्या ईशान्येस सुमारे ४० सागरी मैल अंतरावर एका अज्ञात वस्तूने त्यांच्या जहाजाला धडक दिली. या धडकेमुळे जहाजाच्या इंजिनचे काही प्रमाणात नुकसान झाले. मात्र जहाजावरील कुणालाही दुखापत झाली नाही, अशी माहिती जहाजाच्या कॅप्टनने दिली. यूएईच्या जहाजावर झालेल्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर हा हल्ला करण्यात आला होता का? याबाबत अद्याप स्पष्टता आलेली नाही. तसेच इराणनेही यावर स्पष्टीकरण दिलेले नाही.

### अमेरिकेची होर्मुझमध्ये नाकेबंदी

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प होर्मुझ सामुद्रधुनीत पुन्हा नाकेबंदी लागू केल्याची घोषणा केली आहे. जगाला पुरवठा होणारे २० टक्के तेल आणि गॅसची वाहतूक होर्मुझ सामुद्रधुनीतून होते. इराण आणि त्यांच्या मित्र राष्ट्रांच्या तेलवाहू जहाजांवर सुरक्षेच्या बदल्यात २० टक्के शुल्क आकारले जाई, अशी घोषणा डोनाल्ड ट्रम्प यांनी केली आहे.

# स्टँडअप कॉमेडियन समय रैनाला सर्वोच्च न्यायालयाचा दणका!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**कॉमेडियन समय रैना पुन्हा एकदा वादात अडकला आहे. इंडियाज गॉट लेटेंटच्या पहिल्या सीझनमध्ये यूट्यूबर रणवीर अलाहाबादियाने केलेल्या वादग्रस्त विधानामुळे समय रैनाला अडचणींचा सामना करावा लागला होता. देशभरात विविध ठिकाणी गुन्हे दाखल झाल्यानंतर हा शो बंद करण्यात आला. मात्र आता पुन्हा एकदा समय रैनाने या शोची सुरुवात केली आहे. त्यातच आता सर्वोच्च न्यायालयाने समय रैनाला दणका दिला आहे. त्याने वारंवार खोटी विधाने केल्याबद्दल त्याला १० लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे.**



समय रैनाने न्यायालयाची फसवणूक केली असून त्याला दोन आठवड्यात १० लाख रुपये जमा करण्याचे आदेश देण्यात येत आहेत, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले.

सरन्यायाधीश सूर्य कांत, न्यायाधीश जॉयमाला बागची आणि न्यायाधीश जे. व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. समय रैनाने न्यायालयासमोर खोटी विधाने केली, तसेच त्याला पूर्वी दिलेल्या निर्देशांचे पालन केले नाही, असे सांगून सर्वोच्च न्यायालयाने हा दंड ठोठावला. तसेच दंडाची रक्कम वेळेत भरली नाही तर पुढे कठोर कारवाईचा सामना करावा लागेल, असेही न्यायालयाने सुनावले.

खंडपीठाने दंड भरण्याचे निर्देश देत असताना 'तू कोर्टाची फसवणूक केलीस', असे विधान केले.

समय रैनाच्या इंडियाज गॉट लेटेंटच्या पहिल्या सीझनमध्ये वाद निर्माण झाल्यानंतर यूट्यूबर रणवीर अलाहाबादिया आणि आशिष चंचलानी यांनी क्युअर एसएमए फाउंडेशन यांच्यासमवेत न्यायालयात एक याचिका दाखल केली होती. या याचिकेच्या युक्तिवादादरम्यान वरिष्ठ वकील अपराजिता सिंह यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की, क्युअर एसएमए फाउंडेशन किंवा 'स्पायनल मस्क्युलर अॅट्रोफी' या आजाराने ग्रस्त असलेल्या एकाही रुग्णाशी समय रैनाने संपर्क साधलेला नाही.

समय रैना विविध शो करत आहे. मात्र न्यायालयाच्या निर्देशानंतरही त्याने एसएमए फाउंडेशन किंवा एसएमएने ग्रस्त रुग्णाशी आतापर्यंत संपर्क साधलेला नाही. मला कळत नाही, हा कोणत्या प्रकारचा युवकांचा आदर्श आहे. याचा विचार केला तरी माझ्या अंगावर काटा येतो, असे विधान वकील अपराजिता सिंह यांनी केले.

केंद्र सरकारकडून उपस्थित राहिलेले महाधिवक्ता तुषार मेहता यांनीही समय रैनाच्या वर्तनावर टीका केली. समय रैनाच्या अलीकडील शोजचा दाखला देत मेहता म्हणाले, रैना आपल्या कॉमेडीमधून कायदेशीर कार्यवाहीची खिल्ली उडवत आहे. त्याने त्याच्या एका नव्या शोच्या सुरुवातीला म्हटले की, मागच्या वेळेसारखी चूक तो यंदा करणार नाही आणि त्याने लिंबू-मिरची दाखवली. त्याने कुणाचाही उल्लेख केलेला नसला तरी त्याला काय म्हणायचे आहे, हे कळून येते.

### रैनाच्या वकिलांनी काय सांगितले?

समय रैनाच्या वतीने न्यायालयात बाजू मांडणाऱ्या वकिलांनी सांगितले की, एसएमए फाउंडेशनला संपर्क न साधण्यामागे अहंकार हे कारण बिलकूल नाही. आमच्या अशिलाला हे पटवून देण्यासाठी न्यायालयाचे अधिकारी म्हणून आम्ही प्रयत्न करू. यावर सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. "काही व्यक्ती भारताबाहेर राहून इथल्या कायद्यांना फाटा देऊ शकतात, असे त्यांना वाटते. बाहेरच्या देशात राहतोय याचा अर्थ आपण या देशातील कायद्याच्या कक्षेबाहेर आहोत, असे त्यांना वाटते. आता त्यांना जरा भोगू द्या आणि जर हा अहंकार नसेल तर मग आपल्याला ऑक्सफोर्ड डिक्शनरीतही बदल करावे लागतील", अशा शब्दात सरन्यायाधीशांनी रैनाला सुनावले.

# जान्हवीचा रॉयल अंदाज



बॉलिवूड अभिनेत्री जान्हवी कपूर तिच्या अभिनयाइतकीच फॅशन आणि स्टायलिश लुकसाठीही ओळखली जाते. पारंपरिक पोशाख असो किंवा वेस्टर्न ड्रेस, प्रत्येक लुकमध्ये ती चाहत्यांचे लक्ष वेधून घेते. यावेळीही जान्हवीने तिच्या नव्या पारंपरिक लुकमुळे सोशल मीडियावर धुमाकूळ घातला आहे. तिने काळ्या रंगाच्या आकर्षक डिझायनर लेहंग्यातील काही सुंदर छायाचित्रे सोशल मीडियावर शेअर केली असून तिचा हा रॉयल अंदाज चाहत्यांच्या विशेष पसंतीस उतरला आहे. जान्हवीने परिधान केलेला हा लेहंगा प्रसिद्ध डिझायनर रिंपल आणि हरप्रीत यांनी डिझाइन केला आहे. गडद काळ्या रंगाचा हा लेहंगा अत्यंत आकर्षक आणि राजेशाही स्वरूपाचा दिसत आहे. माध्यमांतील वृत्तांनुसार, या डिझायनर लेहंग्याची किंमत सुमारे दीड लाख रुपये असल्याचे सांगितले जात आहे. महागडा असला तरी त्यावरील नक्षीकाम आणि भरतकामामुळे हा पोशाख अधिक उठून दिसत आहे. या लेहंग्याच्या घेरदार स्कर्टवर अँटिक गोल्ड रंगातील पेसली आणि फुलांच्या नक्षीची सुंदर भरतकाम करण्यात आली आहे. त्यामुळे संपूर्ण पोशाखाला एक वेगळाच रॉयल लुक मिळाला आहे. यासोबत जान्हवीने बहुरंगी भरतकाम केलेली चोळी आणि हलक्या मेटॅलिक बॉर्डरचा दुपट्टा परिधान केला आहे. या पारंपरिक पोशाखामुळे तिचे सौंदर्य आणखी खुलून आले आहे. आपला लुक अधिक आकर्षक दिसावा यासाठी जान्हवीने खास दागिन्यांचीही निवड केली आहे. तिने संजनी ज्वेल्सचे स्टेटमेंट ज्वेलरी परिधान केली असून त्याने तिच्या संपूर्ण लुकमध्ये भर घातली आहे. तसेच मीरा महादेविया यांनी डिझाइन केलेली स्टायलिश बॅगही तिने कॅरी केली आहे. कमीतकमी मेकअप, मोकळे केस आणि चेहऱ्यावरील आत्मविश्वासपूर्ण हास्य यामुळे तिचा हा लुक अधिक उठावदार दिसत आहे.



# तुंबाड 2 मध्ये आलियाची एन्ट्री

तुंबाडच्या यशानंतर आता त्याचा सीक्वल प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. आता ‘तुंबाड 2’ या हॉरर सिनेमातही बॉलीवूडच्या लोकप्रिय अभिनेत्रीची एन्ट्री होणार आहे. अभिनेत्री आलिया भट्ट या बहुप्रतीक्षित सीक्वलमध्ये एका महत्त्वपूर्ण भूमिकेत दिसणार आहे. सोहम शाहने सोशल मीडियावर याबाबत पोस्ट करत चाहत्यांना ही माहिती दिली आहे. विविध प्रकारच्या भूमिका समर्थपणे साकारण्याच्या क्षमतेसाठी आणि धाडसी भूमिकांच्या निवडीसाठी ओळखली जाणारी आलिया भट्ट ‘तुंबाड २’साठी एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. आलिया भट्टबरोबर या सिनेमात अभिनेता नवाजुद्दीन सिद्दीकी देखील महत्त्वाच्या भूमिकेत असणार आहे. अभिनेता-निर्माते सोहम शाह आणि दमदार अभिनयासाठी प्रसिद्ध नवाझुद्दीन सिद्दीकी यांच्यासोबतची तिची ही पहिलीच जुगलबंदी असणार आहे. सोहम शाह यांनी उभारलेले हे विश्व, नवाझुद्दीन सिद्दीकी यांची प्रभावी अभिनयशैली आणि आलिया भट्टची महत्त्वपूर्ण नवी भूमिका यामुळे ‘तुंबाड २’मध्ये एक वेगळीच रंगत निर्माण होणार आहे. ‘तुंबाड 2’ बाबत बोलताना आलिया भट्ट म्हणाली, “मी ‘तुंबाड’ पाहिला तेव्हापासून तो सिनेमा माझ्या मनात कायम आहे. इतका वेगळा आणि प्रभावी सिनेमा फार कमी जण बनवू शकतात. काही सिनेमे असे असतात की, जे रिलीज झाल्यानंतरही अनेक वर्ष प्रेक्षकांच्या मनातून जात नाहीत. अशा जगाचा भाग होणं माझ्यासाठी खूप खास आहे.” आलिया पुढे म्हणाली, “सोहम आणि नवाजसोबत काम करण्यासाठी मी खूप उत्सुक आहे. मी अनेक वर्षांपासून या दोन्ही कलाकारांची चाहती आहे. ‘तुंबाड’सारख्या रहस्यमय आणि लक्षात राहणाऱ्या कथेत अशी भूमिका साकारण्याची मी खूप दिवसांपासून वाट पाहत होते.” दरम्यान, या चित्रपटाचे दिग्दर्शन आदेश प्रसाद करत आहेत. ‘तुंबाड २’ ३ डिसेंबर २०२७ रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे.

# गंभीर-कोहलीमध्ये वादाचे नाट्य

## का रे दुरावा.. का रे अबोला! गंभीर-कोहलीमधील वाद संपता संपेना

महाईन्यूज । बर्मिंगहॅम

**इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यापूर्वी एजबेस्टन येथे झालेल्या भारतीय संघाच्या सराव सत्रादरम्यान एक धक्कादायक चित्र पाहायला मिळाले. यामुळे स्टार फलंदाज विराट कोहली आणि मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्यातील संबंधांबाबत क्रीडा जगतात पुन्हा एकदा चर्चांना उधाण आले आहे. संपूर्ण नेट सत्रादरम्यान या दोघांमध्ये कोणताही संवाद झाला नसल्याचे समोर आले आहे.**



### दुखापतीनंतर विराट कोहलीचे संघात पुनरागमन

आयपीएल २०२६ च्या अंतिम सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू (RCB) कडून खेळताना विराट कोहलीच्या पायाचे स्नायू दुखावले होते. या दुखापतीमुळे त्याला अफगाणिस्तानविरुद्धच्या मालिकेला मुकावे लागले होते. आता त्याच्या पुनरागमनामुळे भारतीय फलंदाजीला मोठी मजबुती मिळण्याची अपेक्षा आहे. भारताला नुकत्याच झालेल्या आयर्लंड आणि इंग्लंडविरुद्धच्या टी-२० मालिकेत सलग पराभवाचा सामना करावा लागला आहे. या पार्श्वभूमीवर, फॉर्म आणि आत्मविश्वास परत मिळवण्यासाठी ही एकदिवसीय मालिका भारतीय संघासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

त्यातच, कर्णधार शुभमन गिलने आपण कोहलीसोबत २०२७ च्या एकदिवसीय विश्वचषकाच्या तयारीबाबत आणि सांघिक रचनेबाबत सविस्तर चर्चा केल्याचा खुलासा केल्याने, मुख्य प्रशिक्षक आणि संघ व्यवस्थापनाच्या भूमिकेवर आता प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

इंग्लंडविरुद्धच्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेला सुरुवात होण्यापूर्वी भारतीय संघाने एजबेस्टनच्या मैदानावर जोरदार सराव केला. दुखापतीतून सावरून भारतीय संघात पुनरागमन करणाऱ्या विराट कोहलीवर सर्वांच्या नजरा खिळल्या होत्या. मात्र, सरावापेक्षाही नेट सत्रात विराट कोहली आणि मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्यात अजिबात अबोला असल्याची बाब अधिक चर्चेत राहिली.

मिळालेल्या माहितीनुसार, गौतम गंभीर सराव सत्रादरम्यान रोहित शर्मा, शुभमन गिल आणि के. एल. राहुल यांच्यासह अनेक वरिष्ठ खेळाडूंशी चर्चा करताना दिसले. दुसरीकडे, विराट कोहली मात्र दीर्घकाळ एकटाच फलंदाजीचा सराव करण्यात मग्न होता. नेट सत्र संपल्यानंतर फलंदाजी प्रशिक्षक सितांशु कोटक हे आधी कोहलीशी स्वतंत्रपणे बोलले आणि त्यानंतर त्यांनी गंभीर यांच्याशी चर्चा केली. परंतु, संपूर्ण सत्रात कोहली आणि गंभीर यांच्यात थेट संवाद झाल्याचे कुठेही पाहायला मिळाले नाही. त्यामुळे या दोघांमधील शीतयुद्धाच्या चर्चांनी पुन्हा एकदा जोर धरला आहे. पहिल्या एकदिवसीय सामन्यापूर्वी झालेल्या पत्रकार परिषदेत भारतीय कर्णधार शुभमन गिलने सांगितले की, त्याची विराट कोहलीसोबत २०२७ च्या एकदिवसीय विश्वचषकाच्या रणनीतीबाबत प्रदीर्घ चर्चा झाली. दक्षिण आफ्रिकेतील खेळपट्ट्या आणि तेथील परिस्थिती लक्षात घेता भारतीय संघाची रचना कशी असावी, भविष्यासाठी कोणत्या खेळाडूंना तयार करणे गरजेचे आहे आणि कोणत्या गोलंदाजांवर, अष्टपैलू खेळाडूंवर तसेच फिरकीपटूंवर संघाने लक्ष केंद्रित केले पाहिजे, यावर दोघांनी सखोल विचारविनिमय केला.

# अर्जेंटिना संघ 'नेव्ही ब्लू' जर्सी घालून मैदानात उतरणार!

महाईन्यूज । अर्जेंटिना

**फिफा २०२६ विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत इंग्लंडविरुद्ध खेळताना, गतविजेत्या अर्जेंटिनाने आपली प्रसिद्ध आकाशी-निळ्या आणि पांढऱ्या रंगाची जर्सी न वापरता निळ्या रंगाची 'अवे किट' (पर्यायी गणवेश) वापरण्याची परवानगी फिफाकडे (FIFA) मागितली होती. फिफाने उपांत्य फेरीच्या सामन्यांसाठी जर्सीची घोषणा केली आहे.**



### अर्जेंटिना संघ पूर्णपणे निळ्या रंगाच्या गणवेशात

संपूर्ण विश्वचषक मोहिमेदरम्यान अर्जेंटिनाने आपला पारंपरिक पट्टेदार 'होम शर्ट' (मुख्य गणवेश) वापरण्याला प्राधान्य दिले आहे; केवळ डॅलास स्टेडियमवर जॉर्डनविरुद्धच्या सामन्यात (जो त्यांनी ३-१ असा जिंकला होता) त्यांनी निळ्या रंगाचा पर्यायी गणवेश वापरला होता. आता उपांत्य फेरीत इंग्लंडविरुद्ध खेळताना अर्जेंटिना संघ आपली प्रसिद्ध आकाशी-निळ्या आणि पांढऱ्या रंगाची जर्सी न वापरता निळ्या रंगाची 'अवे किट' (पर्यायी गणवेश) मध्ये मैदानात उतरेल.

उपांत्य फेरीत अर्जेंटिना इंग्लंडविरुद्ध नेव्ही ब्लू रंगाची अवे जर्सी परिधान करेल.तर अटलांटा स्टेडियमवर होणाऱ्या सामन्यात इंग्लंड आपल्या पारंपरिक पांढऱ्या रंगाच्या होम किटमध्ये मैदानात उतरेल.नेव्ही ब्लू शर्टसोबत अर्जेंटिना काळ्या रंगाची शॉर्ट्स आणि काळे मोजे घालेल, तर इंग्लंड संपूर्ण पांढऱ्या रंगाच्या जर्सीमध्ये असेल.

इंग्लंडविरुद्धच्या महत्त्वपूर्ण उपांत्य फेरीच्या सामन्यासाठी अर्जेंटिनाची तयारी केवळ नेहमीच्या रणनीतिक सरावापुरती मर्यादित राहिलेली नाही. लिओनेल मेस्सी आपल्या कारकिर्दीत पहिल्यांदाच इंग्लंडचा सामना करण्यास सज्ज होत असताना, अर्जेंटिनाला मानसिक आघाडी मिळवायची आहे. यासाठीच संघ व्यवस्थापनाने फिफाकडे त्यांची 'नेव्ही ब्लू' (गडद निळ्या रंगाची) 'अवे किट' (पर्यायी गणवेश) वापरण्याची परवानगी मागितली. ही विनंती इंग्लंडच्या पारंपरिक पांढऱ्या गणवेशाशी दृश्य पातळीवर चांगला विरोधाभास (कॉन्ट्रास्ट) निर्माण करण्यासाठी करण्यात आलेली नाही, तर त्याऐवी एका प्रभावी ऐतिहासिक आठवणीला उजाळा देण्यासाठी करण्यात आली आहे. १९८६ च्या विश्वचषकाच्या उपांत्यपूर्व फेरीत अर्जेंटिना आणि इंग्लंड दोन्ही संघ आमनेसामने आले होते. या सामन्यात दिएगो मॅराडोना यांच्या गाजलेल्या "हँड ऑफ गॉड" आणि "गोल ऑफ द सेंच्युरी" मुळे अर्जेंटिनाला २-१ असा विजय मिळाला होता.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
। बुधवार ।
दि. 15 जुलै 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

### मतदार यादी सुधारणा मोहिमेचा शिक्षणावर परिणाम; वर्गात विद्यार्थी, तर शिक्षक घराघरांत

# एसआयआरच्या कामात शिक्षक व्यस्त; पिंपरी चिंचवडमधील शाळांमध्ये अध्यापनाचा खोळंबा

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**विशेष मतदार यादी सुधारणा (एसआयआर) मोहिमेसाठी शिक्षकांना मोठ्या प्रमाणावर नियुक्त करण्यात आल्याने पिंपरी-चिंचवडमधील अनेक शाळांमधील अध्यापनावर गंभीर परिणाम झाला आहे. शिक्षकांना घरोघरी जाऊन एसआयआर अर्ज भरण्याची जबाबदारी देण्यात आल्यामुळे वर्गात विद्यार्थी उपस्थित असले, तरी शिकवण्यासाठी शिक्षक उपलब्ध नसल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.**



निवडणूक आयोगाकडून महाराष्ट्रासह देशातील १६ राज्ये आणि ३ केंद्रशासित प्रदेशांमध्ये विशेष मतदार यादी सुधारणा मोहीम राबविण्यात येत आहे. मतदार याद्या अधिक अचूक व अद्ययावत करण्यासाठी ही मोहीम सुरू असून, नव्या मतदारांची नोंदणी, मृत किंवा स्थलांतरित मतदारांची नावे वगळणे तसेच तपशील दुरुस्तीची कामे केली जात आहेत.

या मोहिमेसाठी पिंपरी-चिंचवड महापालिका, अनुदानित तसेच खासगी शाळांतील शिक्षकांना विविध भागांमध्ये नियुक्त करण्यात आले आहे. शिक्षकांना २९ जुलैपर्यंत घराघरांत जाऊन अर्ज भरून घेण्याचे आदेश देण्यात आले असून, सुट्टीच्या दिवशीही हे काम करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

यामुळे शाळांमध्ये केवळ मानधनावरील शिक्षक आणि प्रभारी मुख्याध्यापक यांच्या भरोशावर अध्यापन सुरू आहे. अनेक ठिकाणी शिक्षकांच्या कमतरतेमुळे दोन-तीन वर्ग एकत्र बसवून शिकवले जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासासह शिस्तीवरही परिणाम होत असून, शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच शिक्षणाचा खोळंबा झाल्याची भावना पालकांकडून व्यक्त केली जात आहे.

एका पालकाने सांगितले की, शाळा सुरू होऊन महिना उलटला तरी मुलांमध्ये अपेक्षित शैक्षणिक प्रगती झालेली नाही. विद्यार्थी रोज शाळेत जातात; मात्र नियमित अध्यापन होत नसल्याने त्यांचा अभ्यास मागे पडत आहे.




## विद्यार्थी शाळेत अन शिक्षक बाहेर

एसआयआरच्या कामामुळे शाळांमधील सर्व शिक्षक थंम्ब करून बाहेर पडतात. मुले शाळेत येऊन वर्गात तर बसतात; पण शिकवायला आणि शिस्त राखायला शिक्षकच नाहीत. शाळांमध्ये मानधनावरील शिक्षक आणि प्रभारी मुख्याध्यापक हेच शाळांचा गाडा हाकताना दिसत आहेत. शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच एसआयआरमुळे नियमित अध्यापनावर परिणाम होत आहे. यापूर्वी पार पडलेल्या निवडणुकांसाठीदेखील शिक्षकांवर मतदान केंद्रस्तरीय अधिकारी म्हणून जबाबदारी सोपवण्यात आली होती.

## पाल्याला अभ्यासातले काहीच येत नाही

शाळा सुरू होऊन एक महिना झाला तरी आमच्या पाल्याला काहीच येत नाही. थोडीदेखील प्रगती त्याच्यामध्ये झालेली नाही. कारण मुले शाळेत येतात आणि शिकवायला शिक्षकच नाहीत. दररोज शाळेत बसतात आणि शाळा सुटल्यावर घरी येतात, असे एका पालकाने सांगितले.

## शिक्षक फॉर्म भरतायत, विद्यार्थ्यांचा अभ्यास रखडला

पालिकेच्या शाळांमधील जवळपास ९० टक्के शिक्षक सध्या एसआयआर मोहिमेत गुंतले आहेत. त्यामुळे अनेक शाळांमध्ये नियमित अध्यापनावर परिणाम झाला असून, मानधनावरील शिक्षक व मुख्याध्यापकांच्या भरोशावर शाळा सुरू आहेत. अनेक ठिकाणी दोन-तीन वर्ग एकत्र घेण्याची वेळ आली असून, विद्यार्थ्यांचा अभ्यास मागे पडत असल्याची तक्रार पालकांकडून केली जात आहे.

## सर्व वर्ग एकत्र करून अध्यापन

वर्गावर शिक्षक नसल्याने मानधनावरील शिक्षक आणि मुख्याध्यापकांना सर्व वर्गांना एकत्र बसवून शिकवावे लागत आहे. अशा वेळी एकाच वर्गात विद्यार्थ्यांना दाटीवाटीने बसविले जाते. शाळेत शिक्षक नसल्यामुळे वर्गावर विद्यार्थ्यांची भांडणे होतात. एकाचवेळी सर्व विद्यार्थ्यांवर लक्ष ठेवणे अवघड जात आहे.

# मोशी दुर्घटनेतील नऊ बळींचा न्याय हवा

## तपासाआधी संपूर्ण प्रशासनाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करणे चुकीचे!

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**मोशी वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्पातील दुर्घटनेत नऊ निष्पाप कामगारांचा मृत्यू झाला. ही केवळ एक दुर्घटना नाही, तर अनेक कुटुंबांचे आयुष्य उद्ध्वस्त करणारी शोकांतिका आहे. या घटनेतील दोषींवर कठोर कारवाई झालीच पाहिजे, याबाबत कोणाच्याही मनात दुमत असू शकत नाही. पोलिसांनी प्रकल्प प्रमुख आणि सेफ्टी अधिकाऱ्यावर भारतीय न्याय संहितेअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.**



हा तपासाचा पहिला टप्पा आहे. पुढील तपासात आणखी कोणी जबाबदार आढळल्यास त्यांच्यावरही कायदेशीर कारवाई होणे अपेक्षित आहे. मात्र, तपास पूर्ण होण्यापूर्वीच संपूर्ण प्रशासकीय यंत्रणेला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करणे योग्य ठरू शकत नाही. आज काही जण असा युक्तिवाद करत आहेत की, "कचऱ्याचा डोंगर वाढत होता, त्यामुळे सर्व अधिकारी दोषी आहेत." परंतु कायदा अशा गृहितकांवर चालत नाही. कोणत्या अधिकाऱ्याची नेमकी काय जबाबदारी होती, त्याने कोणते कर्तव्य पार पाडले नाही, कोणता अहवाल दुर्लक्षित केला किंवा कोणत्या निर्णयामुळे दुर्घटना घडली, हे तपासातून आणि पुराव्यांमधूनच स्पष्ट होणार आहे.

कंत्राटदार कंपनीची जबाबदारी निश्चित आहे. त्याचबरोबर महापालिकेची देखरेख, प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सूचना, सुरक्षा तपासणी, करारातील अटींची अंमलबजावणी आणि इतर सर्व बाबींचीही चौकशी झालीच पाहिजे. पण चौकशीची मागणी करणे आणि आधीच दोष निश्चित करणे यात मूलभूत फरक आहे.

लोकशाहीत प्रशासनालाही प्रश्न विचारलेच पाहिजेत. ते आवश्यक आहे. मात्र प्रश्न विचारताना न्यायव्यवस्थेवरही विश्वास ठेवावा लागतो. अन्यथा प्रत्येक दुर्घटनेनंतर पुरावे तपासण्यापूर्वीच जनमताच्या न्यायालयात निकाल देण्याची परंपरा सुरू होईल. ती कोणासाठीही हितावह नाही. मोशी दुर्घटनेत कोणालाही अभय मिळू नये. जर तपासात अधिकाऱ्यांची, कंत्राटदाराची, सल्लागार संस्थेची किंवा इतर कोणाचीही जबाबदारी समोर आली, तर त्यांच्यावरही तितकीच कठोर कारवाई झाली पाहिजे. पण तो निर्णय पुराव्यांवर आधारित असला पाहिजे; पूर्वग्रहांवर नाही.

### महत्त्वाचे प्रश्न

- संपूर्ण प्रशासन दोषी असल्याचा दावा करणाऱ्यांकडे त्याचे ठोस पुरावे आहेत का?
- कोणत्या अधिकाऱ्याने कोणते वैधानिक कर्तव्य पार पाडले नाही, याची कागदोपत्री नोंद समोर आली आहे का?
- 'एफआयआर' हा तपासाचा प्रारंभ असताना अंतिम आरोपींची यादी कशी ठरवली जाऊ शकते?
- कंत्राटदाराची कायदेशीर जबाबदारी आणि प्रशासनाची देखरेखीची जबाबदारी यातील फरक मुद्दाम दुर्लक्षित केला जात आहे का?
- चौकशी समितीचा अंतिम अहवाल येण्यापूर्वीच दोष निश्चित करणे न्यायाच्या तत्त्वांशी सुसंगत आहे का?
- उद्या तपासात आणखी अधिकारी दोषी आढळले, तर त्यांच्यावर कारवाई व्हायलाच हवी; पण ते तपासातून सिद्ध व्हावे की आधीच गृहीत धरले जावे?
- आपण खरोखर निष्पक्ष चौकशीची मागणी करत आहोत, की आधी निष्कर्ष ठरवून त्याला पुरावे शोधत आहोत?

## महानगरपालिकेच्या सर्व १० प्रभाग समिती सभापतीपदाची निवडणूक बिनविरोध!

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात महापालिकेच्या सर्व १० प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक प्रक्रिया पार पडली. महापालिकेच्या प्रभाग समिती सभापती पदासाठी प्रत्येक प्रभागातून एकच उमेदवाराचा अर्ज प्राप्त झाल्याने सर्व प्रभाग समिती सभापती पदांची निवडणूक बिनविरोध पार पडली.**


अर्चना कारंडे - अ प्रभाग


मंदार देशपांडे - ब प्रभाग


निखिल बोऱ्हाडे - क प्रभाग


सविता खुळे - ड प्रभाग


अर्चना सस्ते - ई प्रभाग


मनीषा पवार - ग प्रभाग


तृप्ती कांबळे - ह प्रभाग



शिवानी नरळे - फ प्रभाग


आरती चौंधे - ज प्रभाग


रेखा देवकर - ल प्रभाग

या निवडणूक प्रक्रियेमध्ये विभागीय आयुक्त यांच्या आदेशानुसार पुणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त (भा.प्र.से.) प्रजित नायर यांनी पीठासीन अधिकारी म्हणून कामकाज पाहिले.

या निवडणूक प्रक्रियेचे नगरसचिव उल्हास जगताप, मुकेश कोळप, विशेष अधिकारी किरण गायकवाड, प्रभाग अधिकारी निवेदिता घार्गे, गोरक्षनाथ लिमण, अजिंक्य येळे, अश्विनी गायकवाड, परशुराम वाघमोडे, अतुल पाटील, पूजा दूधनाळे, डी.डी. कांबळे, संतोष कोराड तसेच नगरसचिव विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी काम पाहिले तर निवडणूक प्रक्रियेचे सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

पीठासीन अधिकारी प्रजित नायर यांनी आज जाहीर केलेल्या निर्णयानुसार, 'अ' राजगड प्रभाग समितीच्या सभापतीपदी अर्चना करांडे, 'ब' सिंहगड प्रभाग समितीच्या सभापतीपदी मंदार देशपांडे, 'क' विजयदुर्ग प्रभाग समितीच्या सभापतीपदी निखिल बोऱ्हाडे, 'ड' देवगिरी प्रभाग समितीच्या सभापतीपदी सविता खुळे, तर 'इ' शिवनेरी प्रभाग समितीच्या सभापतीपदी अर्चना सस्ते यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे 'फ' तोरणा प्रभाग समितीच्या सभापतीपदी शिवानी नरळे, 'ग' पुरंदर प्रभाग समितीच्या सभापतीपदी मनिषा पवार, 'ह' प्रतापगड प्रभाग समितीच्या सभापतीपदी तृप्ती कांबळे, 'ज' रायगड प्रभाग समितीच्या सभापतीपदी आरती चोंधे आणि 'ल' लोहगड प्रभाग समितीच्या सभापतीपदी रेखा देवकर यांची अधिकृत घोषणा करण्यात आली.

प्रभाग सभापती पदाची निवडणूक पूर्ण संपल्यानंतर प्रभाग समिती सभापतींनी महापौर रवी लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर यांच्यासह पदाधिकारी, नगरसदस्य, नगरसदस्यांची भेट घेतली.

# पिंपरी-चिंचवडच्या विकासाचा ‘ॲक्शन प्लॅन’

## स्थायी सभापती अभिषेक बारणे यांच्याकडून प्रभाग अध्यक्षांना नियोजनाचा ‘कानमंत्र’

**महाईन्यूज** । पिंपरी- चिंचवड

**पिंपरी-चिंचवड शहराच्या पायाभूत सुविधांना बळकटी देण्यासाठी आणि प्रशासकीय कामकाजात अधिक गती आणण्यासाठी महापालिकेच्या दहा प्रभाग समिती अध्यक्षांची महत्त्वपूर्ण बैठक महापौर रवी लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभापतींच्या दालनात पार पडली. आमदार शंकर जगताप, आमदार महेश लांडगे, आमदार उमाताई खापरे आणि आमदार अमित गोरखे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या बैठकीत स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी नवनियुक्त प्रभाग समिती अध्यक्षांना कामकाजाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.**



शहराच्या विकासाची ध्येयधोरणे आणि लोकहिताची कामे गतीने पूर्ण करण्यावर या बैठकीत विशेष भर देण्यात आला.

या बैठकीस राजगड (प्रभाग ‘अ’) समिती अध्यक्ष अर्चना करांडे, सिंहगड (प्रभाग ‘ब’) अध्यक्ष मंदार देशपांडे, विजयदुर्ग (प्रभाग ‘क’) अध्यक्ष निखिल बोऱ्हाडे, देवगिरी (प्रभाग ‘ड’) अध्यक्ष सविता खुळे, शिवनेरी (प्रभाग ‘इ’) अध्यक्ष अर्चना सस्ते, तोरणा (प्रभाग ‘फ’) अध्यक्ष शिवानी नरळे, पुरंदर (प्रभाग ‘ग’) अध्यक्ष मनिषा पवार, प्रतापगड (प्रभाग ‘ह’) अध्यक्ष तृप्ती कांबळे, रायगड (प्रभाग ‘ज’) अध्यक्ष आरती चोंधे आणि लोहगड (प्रभाग ‘ल’) अध्यक्ष रेखा देवकर उपस्थित होते.

अभिषेक बारणे यांनी प्रभागातील अत्यावश्यक नवीन कामे अंदाजपत्रकात तातडीने समाविष्ट करून घेण्यावर भर दिला. यामध्ये महापालिकेच्या हॉस्पिटलला भेट देऊन ‘हेल्प डेस्क’ तयार करणे, मोठ्या सोसायट्यांमध्ये ‘रेन वॉटर हार्वेस्टिंग’ची पाहणी करणे आणि शहरातील ३२ प्रभागांत बोरवेलच्या माध्यमातून पावसाचे पाणी जमिनीत जिरवण्याची (Recharging) मोहीम राबवण्याचे आदेश दिले. तसेच प्रभाग कार्यालयांत नागरिक सुविधा केंद्र, आधार कार्ड आणि एक खिडकी योजना कार्यान्वित करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

महापालिकेच्या शाळांना भेटी देऊन तिथल्या प्राथमिक गरजा पूर्ण करणे, वृक्षारोपणासाठी जागा निश्चित करणे आणि झाडांच्या बुंध्याभोवतीचे कॉंक्रिट काढून झाडे मोकळी करण्यावर भर दिला. पुलांखालील ‘स्नॅक्स सेंटर्स’च्या ठिकाणची स्वच्छता राखून तिथे शौचालय व्यवस्था व्यवस्थित ठेवण्याचे निर्देश देत, प्रभाग अध्यक्षांनी पर्यावरणाचे रक्षण आणि बचतीसाठी इलेक्ट्रिक कारचा वापर करावा, अशी महत्त्वपूर्ण सूचना सभापती अभिषेक बारणे यांनी केली.

### प्रभागाच्या विकासासह नागरिकांचे आरोग्य देखील महत्वाचे

बैठकीत स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी प्रभाग अध्यक्षांना स्पष्ट सूचना देताना सांगितले की, नवनियुक्त प्रभाग अध्यक्षांनी पहिल्या आठवड्यात संपूर्ण प्रभागाची पाहणी करावी. यामध्ये नागरिकांचे आरोग्य, रस्ता रुंदीकरण, रस्ता दुरुस्ती, नाले दुरुस्ती, नाल्यावरील अतिक्रमण काढणे, पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन आणि सार्वजनिक स्वच्छता यांसारख्या मूलभूत प्रश्नांकडे गांभीर्याने पाहण्याचे निर्देश त्यांनी दिले. शहराच्या विकासात लोकप्रतिनिधींची भूमिका महत्त्वाची असून, प्रत्येक प्रभागात ‘हॉकर झोन’ आणि ‘पे-अँड-पार्क’साठी जागा निश्चित करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.



“ आमदार शंकर जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली ही बैठक पार पडली. यामध्ये प्रभाग अध्यक्षांना दिलेल्या नियोजनाच्या कानमंत्रामुळे प्रशासकीय कामात सुसूत्रता येईल. संघटनात्मक बळकटी, प्रभावी नियोजन आणि लोकाभिमुख कार्यपद्धतीच्या माध्यमातून प्रत्येक प्रभागात विकासकामांना अधिक वेग आणि परिणामकारकता प्राप्त होणार आहे. शहराच्या विकासाची ध्येयधोरणे आणि लोकहिताची कामे गतीने पूर्ण करण्यासाठी हे पदाधिकारी आता सज्ज झाले असून, यामुळे पिंपरी-चिंचवड शहराच्या सर्वांगीण विकासाला निश्चितच गती मिळेल.

**– अभिषेक बारणे, सभापती, स्थायी समिती, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

# रावेत पोलिसांनी आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या तरुणाला वाचवले

**महाईन्यूज** । पिंपरी- चिंचवड

**"आई... मी आता नदीत उडी मारतोय..." असे म्हणत व्हिडीओ कॉलवर नदीचे दृश्य दाखवणारा २० वर्षीय तरुण रावेत येथील लंडन ब्रिजच्या संरक्षक जाळीच्या आत कठड्यावर उभा होता. त्याचवेळी गस्तीवरील पोलिसांनी प्रसंगावधान राखत घटनास्थळी धाव घेतली. प्रथम त्याची समजूत काढत त्याला शांत करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर योग्य संधी साधून त्याला मागे ओढत मृत्यूच्या दारातून अक्षरशः खेचून आणले.**



### नागरिकांना आवाहन

नागरिकांनी कोणतीही व्यक्ती संशयास्पद किंवा मानसिक तणावाखाली असल्याचे आढळल्यास तत्काळ पोलिसांना माहिती देऊन मदत करावी, असे आवाहन पोलिस प्रशासनाने केले आहे.

संबंधित तरुण मूळचा बुलढाणा जिल्ह्यातील असून सध्या तो हिंजवडी येथील लक्ष्मी चौक परिसरात वास्तव्यास आहे. वरिष्ठ पोलिस निरीक्षक ऋषीकेश घाडगे यांनी दिलेल्या माहितीनुसार, रावेत पोलिस ठाण्याच्या हद्दीतील लंडन ब्रिज परिसरात रात्री गस्त घालत असताना पोलिस अंमलदार आशिष बोटके आणि दशरथ सदगीर यांना पुलाच्या कठड्यावर एक तरुण संशयास्पद अवस्थेत उभा असल्याचे दिसले. त्यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत त्याच्याशी संवाद साधला. त्यावेळी तो आत्महत्येच्या उद्देशाने नदीत उडी मारण्याच्या तयारीत असल्याचे त्यांच्या लक्षात आले.

दरम्यान, संबंधित तरुणाने आपल्या आईला व्हिडीओ कॉल करून नदीचे दृश्य दाखवत आपण नदीत उडी मारणार असल्याचे सांगितले. ही माहिती मिळताच त्याची आई रावेतच्या दिशेने निघाली. तोपर्यंत पोलिसांनी संयम राखत त्याची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. संवाद सुरू असतानाच पोलिसांनी त्याचे लक्ष दुसरीकडे वळवले आणि योग्य क्षण साधून मोठ्या धाडसाने त्याला मागे ओढून सुरक्षित बाजूला आणले. त्यामुळे मोठा अनर्थ टळला.

प्राथमिक चौकशीत, मोबाईलवरील ऑनलाइन जुगारात सुमारे १५ हजार रुपये गमावल्याने संबंधित तरुण मानसिक तणावात आला होता. त्यातूनच त्याने आत्महत्येसारखा टोकाचा निर्णय घेतल्याचे समोर आले. या घटनेमुळे युवकांमध्ये वाढत्या ऑनलाइन जुगाराच्या व्यसनाचा आणि त्यातून निर्माण होणाऱ्या आर्थिक तसेच मानसिक संकटाचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

घटनास्थळी पोहोचलेल्या आईने मुलाला सुखरूप पाहताच सुटकेचा निश्वास सोडला. त्यानंतर पोलिसांनी संबंधित तरुणाचे समुपदेशन करून त्याला कुटुंबीयांच्या ताब्यात दिले. पोलिसांच्या या धाडसी आणि प्रसंगावधान राखणाऱ्या कामगिरीमुळे एका तरुणाचे प्राण वाचले आहेत. त्यांच्या कामगिरीचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. पोलिसांच्या धाडसी हस्तक्षेपामुळे अनर्थ टळलाअसून, समुपदेशनानंतर कुटुंबीयांच्या ताब्यात देणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

DYP
Dr. D Y PATIL EDUCATIONAL COMPLEX, AKURDI, PUNE

D Y PATIL EDUCATIONAL COMPLEX
AKURDI, PUNE

43 Years of Excellence in Education

# Your Pathway to Leadership Begins at D Y PATIL

## ADMISSIONS OPEN 2026-27

## Our Institutes

### COLLEGE OF ENGINEERING (AUTONOMOUS)
Accredited by **NAAC** with **'A'** Grade & **NBA** NRI Quota Available
**UC**- Comp / Mech / IT / E&TC / AIDS / Civil / Instrumentation & Control / R&A
**PG**- Comp / E&TC (VLSI/ES) / Civil (C&M/Env) / Mech (Design) / R&A
**PhD**- Mech / ENTC / Civil

### INSTITUTE OF MCA & MANAGEMENT
Accredited by **NAAC** with **'A'** Grade & Affiliated to SPPU
MCA / MBA / PhD (Management)

### COLLEGE OF ARCHITECTURE
Accredited by **NAAC** with **'A'** Grade & Approved by COA
B.Arch / M.Arch (Construction Management) / D.Arch

### PGDM INSTITUTE
Approved by A.I.C.T.E., New Delhi & Recognized by Govt. of Maharashtra
NRI Quota Avaliable
**Specializations:** Marketing / Human Resource / Finance / Logistics & Supply Chain / Business Analytics & Business Analytics with AI / Innovation & Entrepreneurship / Agri Business / Pharma & Healthcare Management

### COLLEGE OF AGRICULTURE BUSINESS MANAGEMENT
Affiliated to Krishi Vidyapeeth, Rahuri & Recognized by MCAER, Pune
BSc (Hons) Agri Business Management

### COLLEGE OF PHARMACY
Accredited by **NBA** & **NAAC** with **'A+'** Grade
Affiliated to SPPU & Approved by PCI New Delhi
D.Pharm / B.Pharm / Pharm D. / M.Pharm (Pharmaceutics) / M.Pharm (Pharmaceutical Quality Assurance) / M.Pharm (Pharmaceutical Chemistry) / M.Pharm (Pharmacology) / M.Pharm (Regulatory Affairs) / M.Pharm (Phytopharmacy & Phytomedicine)

### INSTITUTE OF PHARMACY
Affiliated to MSBTE, Mumbai & Approved by PCI New Delhi
D.Pharm

### Y B PATIL POLYTECHNIC
Approved by AICTE, Affiliated to MSBTE & Recognized by D.T.E. Maharashtra
(Accredited by **NBA**)
Diploma in Civil / Mech / Comp / E&C

## Why Choose Us?

- Green & Modern Campus
- Smart Classrooms & Digital Learning
- Experienced Faculty & Excellence
- Global University Collaborations
- Wi-Fi Campus & Modern Facilities
- Sports, Cafeteria & Auditorium
- Safe & Disciplined Environment
- International Academic Tours
- Modern Boys & Girls Hostels
- DYP Dnyansagar Incubation Foundation



**Address:** Sector No. 29, Nigdi Pradhikaran, Akurdi, Pune 411044, Maharashtra, India
www.dypakurdipune.edu.in admission@dypakurdipune.edu.in @dypakurdipune
9373775038 / 9607957618 / 9075345011 / 9158195999
REGISTER HERE